*कथा क्रमांक ९*

# जीवन यांना कळले हो

दिवसभर पावसाची रिपरिप चालूच होती आणि आता पाच वाजल्यापासून चांगलाच पाऊस कोसळू लागला होता. हातातल्या पिशव्या सांभाळत तिने चावीने दार उघडले. पाच वाजले होते, पण इतका अंधार दाटून आला होता की जसे काही रात्रीचे ९-१० च वाजले असं वाटत होतं. कामावरून दमून आल्यामुळे तिने आल्याचा चहा केला टीव्हीसमोर बसून गरम गरम चहाचा आस्वाद ती घेऊ लागली. "काय जिणं आहे आपलं? एकटीनंच सर्व करायचं." तिच्या मनाला विचार चाटून गेला. "पैसा रग्गड कमावतो आपण पण त्याचा उपभोग घ्यायला वेळ आहे का आपल्याकडे? श्री कन्सल्टिंगमध्ये असल्यामुळे तो सारखा फिरतीवर. आता त्याला दुबईमध्ये प्रोजेक्ट मिळालं आहे. तीन महिने तो तिथेच राहणार आहे. अनुजला यंदाच प्रिन्सटन युनिव्हर्सिटीमध्ये प्री-मेडसाठी प्रवेश मिळाल्यामुळे तोही तिथेच. फोन येतो त्याचा, फेसटाईमही होतं पण मुलगा इतक्या लांब एकटाच, त्यात अवखळ वय - काळजी वाटतेच.

भरकटलेल्या मनाला तिने आवर घातला. सर्वांचं आयुष्य आता असंच आहे. काहीतरी चांगलं कमावण्यासाठी काहीतरी गमवावं लागतंच. एका चांगल्या आय टी कंपनीमध्ये ती 'टीम मॅनेजर' पदावर आहे. आपलं काम अतिशय इमानेइतबारे व जबाबदारीची जाणीव ठेवून सांभाळत आहे. समाजात तिला चांगला मान आहे. काही लोक तिला असे सल्ले द्यायचे, " कशाला करतेस इतकी दगदग? नवऱ्याला लठ्ठ पगाराची नोकरी आहे. मस्त त्याच्याबरोबर भटकायचं सगळीकडे आणि आता तर काय अनुजही लांब कॉलेजमध्ये. तुझी जबाबदारी संपली."

कधी कधी तिलाही वाटायचं, खरंच आपलं श्रीबरोबर जावं, मस्त हॉटेलमध्ये रहावं . पण दुसऱ्याच क्षणी स्वतःचं स्वावलंबी जीवन सोडणं म्हणजे फार मोठी चूक आहे याची जाणीव तिला व्हायची आणि मग नकोच कुणाचं ऐकायला. आहे ते सगळ छान आहे.

ऑफिसमधून येता येता तिने दूध, ब्रेड, अंडी अशी काही ग्रोसरी आणली होती. त्या पिशव्या तश्याच पडल्या होत्या. त्या वस्तू तिने जागच्या जागी लावल्या व संध्याकाळच्या जेवणाची तयारी करायला हवी म्हणून ती उठली. एकटीसाठीसुद्धा काहीतरी करायला हवंच ना? पाऊस कोसळतच होता. आता तर वाराही सुटला होता जोरदार. काही झाडांच्या फांद्या निखळून पडत होत्या. तिच्या मनात विचार आला "आता पॉवर फेल झाली नाही म्हणजे मिळवलं."

भारतात आत्ता किती बरं वाजले असतील? आपल्याकडे संध्याकाळचे सात म्हणजे..... छे ! फोन नाहीच करता येणार. ती मंडळी छान साखरझोपेमध्ये असतील. भलत्या वेळी फोनची रिंग ऐकून घाबरून जातील उगीचच.

तिने पटापट पोळी भाजी खाऊन घेतली, दुसऱ्या दिवशीचा डबापण तयार करून ठेवला आणि क्लोजेटमधून तिच्या व श्रीच्या लग्नाचा फोटो अल्बम बाहेर काढला. अल्बमचे फोटो पाहण्यातली गंमत काही वेगळीच असते. एकेक पान उलटताना ती वीस वर्षं मागे गेली. श्रीची आणि तिची

पहिली भेट, घरच्यांना नकळत चौपाटीवर फिरणं, श्रीबरोबर पाहिलेला पहिला सिनेमा. सर्व चित्रपट तिच्या डोळ्यासमोरून सरकला. अल्बम पाहताना तिचा डोळा कधी लागला ते कळलेच नाही . मांडीवर उघडा पडलेला अल्बम, सोफ्यावर आडवी पडलेली तिची मान आणि चेहऱ्यावर अतिशय समाधानाची स्मितरेषा .....

निशा स्वप्नदुनियेत असताना फोन वाजला. ती दचकून उठली. फोन अरुणकाकांचा होता. "मी विचार करतोय पुढच्या आठवड्यात माझ्या लाडक्या पुतणीला भेटायला यायचा," हे ऐकून अतिशय आनंदाने तिने होकार दिला. तिच्या ह्या आवडत्या काकांच्या सहवासात तिला नेहमी लहान मुली सारखं वाटायचं. त्यांची स्वतःची दोन मुलं होती; नातवंडे पण होती. पण त्यांचा निशावर जीव होता. लहानपणी तिला गोष्टी सांगणारे, तिच्या आवडी लक्षात ठेवणारे, खेळता खेळता नकळत तिच्या ज्ञानात भर घालणारे हे काका. निशाच्या वडिलांना जे कधीच जमले नव्हते - मुलांच्या जवळ येणे - हे तिच्या काकांनी अगदी सहजपणे करून दाखवले होते. म्हणून निशा आता दिवस मोजू लागली . Christmas च्या आधी काका आणि अनुज दोघेही येणार; हे रिकामं घर पुन्हा भरणार. तिने ऑफिस मधून सुट्टी घेतली होतीच. पुढचे तीन दिवस तिचे तयारीत कसे गेले हे काही कळलेच नाही.

काका घरी आल्यावर जेवण झाले, व नंतर भरपूर गप्पा रंगल्या. काकांना सगळी माहिती हवी होती. श्रीच्या फिरत्या, तिची नोकरी, अनुजचे कॉलेज. प्रिन्स्टनची ख्याती जगभर पसरली होतीच.

"शेवटी बाहेर पाठवलेस त्याला," काका म्हणाले .

"स्वावलंबन शिकावे म्हणून, काका. आणि त्याला तेच कॉलेज हवे होते ना," निशा म्हणाली .

"तेही बरोबर आहे " काकांनी होकार दिला.

संध्याकाळी अनुज घरी आला, काकांना नमस्कार केला. वर bags ठेऊन येतो म्हणाला, व जो पसार झाला तो जेवणाच्या वेळे पर्यंत खाली काही आला नाही. जेव्हा जेवायला हाक मारली तेव्हा "I'll eat later. Leave my food on the counter," असे उत्तर ऐकायला मिळाले. काका व निशाचं जेवण झाल्यावर तासाभराने खाली आला. आपली ताटली भरून TV समोर बसला. काकांच्या प्रश्नांना थोडक्यात सेल फोन ची बटने दाबत दाबत उत्तरे दिली .

पुढचे दोन दिवस असेच गेले. काका व निशाच्या गप्पा छान रंगल्या, पण अनुजशी गप्पा मारणे फार कठीण काम होते हे काकांच्या लक्षात आले. कुठलाही विषय काढला की एक-दोन शब्दांची होकार -नकारात्मक उत्तरे मिळायची, आणि ती ही नजरेला नजर न मिळवता. सेल फोन किंवा laptop वर काही तरी type करता करता. अगदी नाइलाजाने उत्तरं देत होता जणू.

निशाने सांगितलेली कामं पण "आता वेळ नाही, मग करतो," अशा उत्तराने पुढे ढकलत होता; किंवा मग नाराजीने उठून मदत करत होता. त्यांच्याशी तर नाहीच, पण निशाशी पण गप्पा मारत नव्हता तो. तिने प्रयत्न केला तरी.

काकांच्या मनात विचार आला: मुलांनी एकटे कसे राहावे शिकावे जरूर, पण लोकांमध्ये राहण्याची सवय न घालवता. स्वावलंबन शिकताना चुकूनही स्वतःपुरतं जगणं शिकू नये त्यांनी. जगात आपल्या शिवाय इतर लोक

असतात हे विसरू नये कधीच. आणि कधी कधी संवाद आपल्यापेक्षा लहान - मोठ्यांशी पण करावा लागतो, हेही विसरू नये.

निशावर जीव असल्यामुळे त्यांना हे वागणे बघून दुःख झाले. श्री आणि निशाचे तरी संवाद होत असतील का? की एकत्र आले तरी एकामेकांशी संबंध नसलेल्या तीन जीवांसारखे हे तिघे वावरतात? काका विचारात पडले.

बाप रे ... ३ मिस्ड कॉल्स... आता काही खरं नाही!! श्री मनातल्या मनात बोलून गेला. निशा आता चांगलीच ओरडणार मला. काय करणार... ह्या मीटिंग्ज संपता संपत नाहीत. घरी आल्यावर फोन, आय पॅड यांच्याकडे अगदी बघवत नाही. पण निशा एरवी टेक्स्ट पाठवते, आता डायरेक्ट फोन केला. नक्की काय झालं असेलय़ अनुज तर ठीक असेल नं! निशाची तब्येत.... की आणखी काही ? करावा का तिला फोन लगेच, पण आता तिथे मध्यरात्र झालीय. माझ्या फोनने घाबरतील दोघे. ‘ अनुज आणि निशा !!! किती मिस् करतोय मी तुम्हां दोघांना!! ’

श्रीच्या मनात काहूर उठलं . काय उपयोग ह्या लठ्ठ पगाराचा, ह्या आलिशान राहणीमानाचा ...! दोन प्रेमाच्या गोष्टी बोलायला कुणी जवळ नाही. निशाची आणि आपली वेळ आता जमता जमत नाही मग, उगाचच कोरडे टेक्स्ट पाठवायचे, फोन करता येत नाही म्हणून "love you! miss you! " इतके कसे कोरडे झालो आपण.
लग्नाआधी किती वेळ ताटकळत एकमेकांची वाट बघायचो. तास न् तास हळूहळू खोलीचे दार बंद करून फोनवर काय बोलायचो? आता आश्चर्यच वाटतं. अनुज झाला तेव्हा जग जिंकल्याचा आनंद झाला होता ! ऑफिस, मित्र, नातेवाईक सगळे अगदी "lucky you " चा जयघोष करीत होते आणि आज त्याच अनुजला बघायला वर्षभर थांबतो आपण. आपल्या पोराला बघायला .... ! तिघांचंच विश्व आपलं, पण इतकं कसं बदललं? कधी बदललं ? का बदललं? कळत नाहीये. अचानक सगळं सोडून त्या दोघांकडे परत जावेसे वाटतंय.

मरू दे हा जॉब, मरू दे अँबिशन . अरे, असे का निगेटिव्ह विचार येत आहे आपल्या मनात? मिड लाईफ क्रायसिस की काय हा?

श्रीने उठून चहा केला. जरा जास्तच आलं घातलं.
खरं तर आत्ता मस्त दोन पेग घ्यायचे ,एखादा बिनडोक sexy movie पाहायचा आणि मग जेवण असा कार्यक्रम त्याच्या डोक्यात होता. पण निशाच्या या मिस्ड कॉल्स् मुळे सगळाच मूड बदलला.
शेवटी श्रीने मनाला समजावले, हिय्याच केला ना मनाचा आणि निशाचा नंबर फिरवला. बीप बीप... नुसताच आवाज येत राहिला. त्याने पुन्हा नंबर दाबला आणि answering machine वर मेसेज ठेवला. " निशा, मी श्री बोलतोय. एवढ्या रात्री फोन करतोय तुला. तुझा मिस कॉल बघितला आणि राहावलं नाही. सॉरी, मी मीटिंग मध्ये होतो. जाऊ दे. तू जेव्हा उठशील तेव्हा फोन कर... टेक्स्ट नको... मला आत्ता तिथे यावंस वाटतंय... "
श्रीचे लक्षच नव्हते. answering machine ची बीप संपून " you may hang up now " आलं तरीही श्री भडभडा बोलतच राहिला... स्वतःशीच, फोनशी, फोनवरच्या निशाशी !!!!!

निशा काकांच्या समोर जरी काही दाखवत नसली तरी तिला अनुजची आता काळजीच वाटायला लागली होती. हा मुलगा असा काय वागतोय, कोणाशी काही बोलत का नाही, एवढा गप्प गप्प का बरं झालाय? एरवी एवढं भरभरून बोलणारा, सारखा मॉमभोवती भिरभिरणारा. सगळेजण अगदी 'ममाज् बॉय' असेच म्हणायचे.

तिच्या मनात नाही नाही ते विचार येत होते. याला कॉलेजमध्ये इतर मुलं रॅगिंग तर करत नसतील? याला कॉलेजमध्ये शिकवले जाणारे सर्व विषय नीट समजत असतील ना की काही कठीण तर जात नसतील? एखाद्या विषयात मार्क कमी मिळाले असतील, अगदी नापासही झाला असेल. अरे पण सरळ सरळ सांगून टाकायचं ना! छे! एवढा हुशार मुलगा. एवढे छान मार्क मिळवून प्रिन्स्टनसारख्या कॉलेजमध्ये आणि तेही प्री-मेडला ॲडमिशन मिळवलेला माझा लेक, ही शक्यता कमीच. पण मग काय? प्रेमप्रकरण? एखादी मुलगी आवडून तिच्या प्रेमात पडला असेल? पण तेही चालेल कारण हे वयच तसे असते. अगदी नैसर्गिक आहे. निशाने ते दोघेच असताना म्हणजे काका आसपास नसताना किती वेळा अनुजला विचारण्याचा प्रयत्न केला पण स्वारी ढीम्म. त्याने ताकास तूर लागू दिला नाही.

सकाळी उठल्या उठल्या फोनेवरील श्रीचा मेसेज ऐकून निशाने वर आपल्या खोलीत जाऊन दार लावून घेतले व लगेच श्रीला फोन लावला. श्रीने दुसऱ्या बाजूने फोन उचलताच हिच्या तोंडून एक हलकासा हुंदका बाहेर पडला.

श्री (घाबरून) – " निशी, काय झालं? तू रडतेस का? इतकी का घाबरली आहेस? मलाही रात्री तुझे तीन मिस्ड कॉल्स बघून जरा भीती वाटली. धड झोपही लागली नाही. निशी लवकर सांग काय झालंय ते. मला आता धीर धरवत नाहीये."

निशाने त्याला सर्व हकीकत सांगितली. तिला आलेल्या सर्व शंका सांगून ती म्हणाली –

"मला तर आता इतकी भीती वाटतेय की हा काही ड्रग्ज वगैरेच्या फंदात रॅकेटमध्ये तर अडकला नसेल ना? माझा जीव नुसता उडून गेलाय श्री. मी काय करू मला काही सुचतच नाहीये. मी त्याला अनेक वेळा विचारण्याचा प्रयत्न केला श्री. पण घरात काका असल्यामुळे जरा पंचाईतच झाली आहे. "

श्री – " तू एवढी पॅनिक होऊ नकोस निशी. मला कळतंय, तू एकटी असल्यामुळे आणि ह्या बाबतीत बोलायला, डिस्कस करायला तुझ्याजवळ कोणीच नसल्यामुळे तुला ही जास्तच

काळजी वाटतेय. पण जरा शांत हो. आपल्या अपब्रिंगिंगवर विश्वास ठेव निशी. अनुज तसलं काहीही भलतंसलतं करणार नाही याची मला खात्री आहे.”

निशा – “ अरे तू मला हे सर्व तिथून सांगतोयस् पण मन चिंती ते वैरी न चिंती. खरंच मला खूप खूप काळजी वाटते रे! अनुज आपल्या दोघांचं सर्वस्व आहे रे श्री.”

श्री – “ निशी, तू प्लीज़ काळजी करू नकोस. माय फॅमिली कम्स फर्स्ट. इतर सर्व गौण आहे. आता मलाही इथे थांबवणार नाही. मिळेल त्या पहिल्या फ्लाईटने मी तिथे निघून येतो.”

अनुजच्या काळजीने श्री व निशा दोघेही नुसते हवालदील झाले होते. हे असं एकमेकांपासून लांब रहाणं, हा जीवनाचा संघर्ष हे सगळं कोणासाठी? एवढे मोठ्ठाले पगार काय कामाचे? नाही, नाही, देवा, आता तूच आम्हाला यातून मार्ग दाखव.

अनुजला डॅड येत असल्याची बातमी जेव्हा कळली तेव्हा तो सरळ आपल्या रूममध्ये गेला. “येस, येस, ओह गॉड थँक यू. व्हॉट एल्स डू आय वॉन्ट? ” त्याला खूपच आनंद झाला होता. इतके दिवस फोन, ईमेल्स करून, सगळ्यांशी संपर्क साधून सगळं जमवून आणलं होतं, आपल्या सरप्राइज़बद्दल गुप्तता राखायला सांगून त्याने हेडकाऊंटही घेतला होता. एवढंच नव्हे तर केटरर्स, व्हेन्यू, मेनू सगळं ठरवून ठेवलं होतं. आता 27 डिसेंबरला जे त्याने ठरवलंय ते नक्की होणार. इथे आल्यापासून कशात लक्ष नसण्याचा, तोंड पाडून बसण्याचा, शिवाय गुप्तता राखण्यासाठी व हसू येऊ नये म्हणून मॉमसमोरही जास्त वेळ न थांबण्याचा जो काही नाटकीपणा केलाय, जी काही मेहनत घेतलीय त्याचे चीज होणार आहे.

इकडे आई-वडिलांच्या जीवाची एवढी घालमेल चालू असताना अनुजचं हे काय चालू होतं?

सुट्टीसाठी आल्यापासून अनुज २७ डिसेम्बर चे गुपित कसे लपवून ठेवावे याच विचारात होता. मागच्या महिन्याभरापासून त्याने आई वडलांच्या जवळच्या मित्र मैत्रिणींशी फोन, मेसेज आणि भारतातल्या जुन्या मित्र मैत्रिणींशी, त्याच्या आजी आजोबा आणि मावशी काकांच्या सहाय्याने संपर्क साधला होता. अमेरिकेतल्या सगळ्या दूर दूरच्या नातलगांना, स्नेहींना त्याने बोलावले होते. आणि भारतातल्या लोकांकडून व्हिडीओ क्लीप मागवल्या होत्या. आई बाबांच्या आवडते अगदी अळूवडी, मोदक पासून ते सोलकढी पर्यंत मेनू ठरवला होता.
निमित्त होते आई वडलांच्या लग्नाच्या २५ व्या वाढदिवसाचे. आणि अजिबात कोणालाही याची काहीही वार्ता न लागू देता अशा समारंभाचे नियोजन करणे म्हणजे खरे तर खूप अवघड काम होते पण आत्तापर्यंत तरी जमले होते.
या सगळ्या गडबडीत त्याने त्याची जिवाभावाची सखी जॉय ची सुद्धा मदत घेतली होती. जॉय मुळची घाना देशातली होती पण शिकायला अमेरिकेत आली होती. पैशाच्या मागे न लागता समजत ज्यांना विद्याकीय मदतीची गरज आहे अशांना मदत करणे या एक ध्येय असलेल्या अनुज आणि जॉय ची घट्ट मैत्री जमली होती आणि बघता बघता प्रेमात रुपांतर देखील झाले होते.
जॉय देखील समारंभाला येणार होती. अनुज च्या मनात आईवडील जॉय ला स्वीकारतील का असे राहून राहून मनात येत होते.
इकडे निशा आणि श्री आणि काका सगळे चिंतेत होते कि या मुलाला नक्की झालय काय? अनुज ने एकदाच तिघांना बसवून सांगितले कि माझी काळजी करू नका मी व्यवस्थित आहे.
पाहता पाहता २७ डिसेम्बर आला, दुपारी ठरल्याप्रमाणे आईबाबांचे मित्र त्यांना बाहेर घेऊन गेले आणि परोस्पर पार्टी च्या ठिकाणी घेऊन आले. सगळे लोक बरेचसे त्यातले भारतीय असून देखील वेळेवर आले होते आणि अनुज आणि निशाला मोठ्ठा आनंदाचा धक्काच बसला. इतके दिवस आपल्याशी तुटक वागणारा मुलगा आपल्याचसाठी, आपल्या आनंदासाठी झटत होता याहून आईवडलांना कोणता मोठा आनंद असणार…. श्री आणि निशा चे डोळे भरून आले. काका देखील हे सगळे बघत होते, त्यांनाही खूप आनंद झाला.
आता आलेली लोकं निवांत गप्पा मारत, जेवणाचा आस्वाद घेत होती. अनुज आई बाबांना एका टेबलाजवळ घेऊन गेला आणि जॉय शी ओळख करून दिली. सध्या, मध्यमवर्गीय घरातून आलेल्या निशा आणि श्री ला जोय ला बघून थोडा धक्काच बसला.

पार्टी झाल्यावर घरी अनुज शी बोलायला दोघेही बसले आणि जॉय कुठे भेटली वगैरे प्रश्न विचारले. काल परवा पर्यंत जादूच्या गोष्टी वाचणारा आपला मुलगा आज त्या दोघांना खूप प्रगल्भ वाटत होता.
अनुज ने आई वडलांना स्पष्ट सांगितले कि मेडिकल चे शिक्षण पूर्ण झाल्यावर तो आणि जॉय, भारतात जाऊन काम करणार आहेत आणि तिथेच राहणार आहेत. निशा आणि श्री चा विश्वास बसत नव्हता, त्यांनी अनुज ला समजवायचा थोडा प्रयत्न केला.

पण अनुज चा निर्णय ठाम होता, अशा वेळी काका पुढे झाले आणि म्हणले कि तुमच्या काळी तुम्ही तुमचा देश सोडून इथे अजून उज्वल भविष्यासाठी आलात आज जर तुमची पुढची पिढी अजून काहीतरी समाजच्या विकासासाठी काम करू इच्चीते तर त्यात आडकाठी आणणारे आपण कोण आणि देश, रंग, जात, पैसा याच्या पलीकडे जाऊन जर इतक्या वर्षानंतर देखील आपण विचार करायला शिकलो नसू. मी, माझे घर आणि माझी मुले आणि माझा पैसा या चाकोरीबाहेरचे जगच तुम्हाला दिसेनासे झाले असेल तर या वैभवाचा काय फायदा.
परदेशात राहून आपण आपल्या मुलाला योग्य ती मुल्ये शिकवतोय का असा प्रश्न पडलेल्या निशाला मनात कुठेतरी खूप बरे वाटत होते.त्या क्षणी निर्णय झाला, निशा म्हणाली कि मी देखील तुमच्या कामात तुम्हाला मदत करणार. तुम्ही जिथे जाल तिथे, तुमची सहाय्यक म्हणून काम करणार. आपली आई देखील आपल्या निर्णयाशी सहमत आहे हे पाहून अनुज ला खूप आनंद झाला.
शेवटी ते गाणे आहे न तसे, दर लागी लेकिन मैने अब ही जीना सिख लिया. फार लहान वयातच अनुज ला. जॉय ला आणि त्यांच्यामुळे निशा ला देखील एक फार सुंदर दिशा मिळाली आयुष्य जगायला तशीच तुम्हांला आम्हांला मिळो, आणि हि साठ प्रश्नांची कहाणी एकाच उत्तरी सुफळ संपूर्ण.